दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २८५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.९ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## रिक्षा पलटी होऊन अपघात : पती-पत्नी ठार

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत हद्दीतील भोईघर फाटा पासून काही अंतरावर असणाऱ्या बामणकोंडी वळणावर रिक्षा पलटी होऊन अपघात घडला.

या अपघातात रिक्षातील पती–पत्नी या दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. डोंबिवली सोनारपाडा येथे राहणारे जगदीश मोतीराम वणे (वय ३५) व ज्योत्स्ना जगदीश वणे (वय २८) हे दोघे मुरूड तालुक्यातील काजूवाडी येथे रिक्षाने आले होते.

ते दोघेही साडेआठचे सुमारास काजूवाडी ते भोईघर मार्गे बोर्लीकडे येत असताना रिक्षा बामणकोंडी वळणावर पलटी झाली. त्यांना लागलीच बोर्ली प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले, तेथील डॉक्टरांनी ते दोघेही मयत झाल्याचे सांगितले. सुदैवाने रिक्षा चालक अभिषेक चंद्रकांत राजापरकर हा या अपघातातून बचावला. या अपघाताचा अधिक तपास रेवदंडा पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार गणेश म्हात्रे हे करत आहेत.

## लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण

# १३ जानेवारीला 'भूमिपुत्र परिषद' तर २४ जानेवारीला विमानतळ काम बंद आंदोलन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, यासाठी दिबासाहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून १३ जानेवारीला रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर या जिल्ह्यातील समस्त भूमिपुत्रांची 'भूमिपुत्र परिषद' तर २४ जानेवारीला विमानतळ काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने आज (शनिवार, दि. ०८)पनवेल येथे आगरी समाज सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. पुन्हा एकदा एल्गार करण्याची तयारी पूर्ण झाली असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले असून जो पर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यत लढाई सुरूच राहणार असल्याची गर्जना करण्यात आली.**

लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेस समितीचे कार्याध्यक्ष माजी खासदार संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, सरचिटणीस भूषण पाटील, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, सहचिटणीस गुलाब वझे, संतोष केणे, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, खजिनदार जे. डी. तांडेल, सदस्य नंदराज मुंगाजी, रुपेश धुमाळ, दशरथ भगत, दीपक पाटील, विनोद म्हात्रे, विजय गायकर, जयेश आक्रे, भुवनेश्वर धनु, जितेंद्र म्हात्रे, गजानन मांगरूळकर, सुनील पाटील, डी. बी. पाटील, यांच्यासह नवी मुंबई, पनवेल, उरण, मुंबई, ठाणे, कल्याण आदी विभागातील प्रकल्पग्रस्त समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी पत्रकारांना माहिती देताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले कि, समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांच्या पत्नीची प्रकृती ठीक नसल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, त्यामुळे ते आजच्या पत्रकार परिषदेला येऊ शकले नाहीत. पुढे त्यांनी म्हंटले कि, पनवेल, उरण, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली या प्रकल्पग्रस्तांच्या सर्व संघटना प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांचे अस्तित्व जपण्याचे काम करीत आहेत. भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांना काम देणे हि जबाबदारी सरकारची आहे. प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न आहेत ते मार्गी लावण्याबरोबरच लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला लागलेच पाहिजे हि सर्व भूमिपुत्रांची आग्रही आणि रास्त मागणी आहे. मागील वर्षी १० जून, २४ जून आणि ९ ऑगस्टच्या आंदोलना निमित्ताने लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाने सारा भूमिपुत्र समाज एकवटला. लाखोंच्या संख्येने सहभागी झालेल्या भूमिपुत्रांची ताकत संपूर्ण भारताने पाहिली, आता दिबांच्या जन्मदिनी म्हणजेच १३ जानेवारी रोजी भव्य भूमिपुत्र परिषद कोल्ही कोपरगाव, दत्त मंदिराजवळ (ता. पनवेल) विमानतळ परिसरात आयोजित करण्यात आली आहे. आणि ही परिषद म्हणजे प्रकल्पग्रस्त भूमिपूत्रांच्या अस्मितेची अस्तित्वाची आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणिव करून देणारी आहे. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे या मागणीसाठी आहे.

> लोकनेते दि. बा. पाटील साहेबांचे नाव विमानतळाला लागलेच पाहिजे हि भूमिका अनेकदा आंदोलन आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या बैठकीत विशद झाली आहे, आणि भूमिपुत्रांना काय म्हणायचे आहे हे हि त्यातून स्पष्ट झाले आहे. मात्र सिडको आणि राज्य सरकार भूमिपुत्रांच्या न्यायिक भावनेकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. जो पर्यत दिबासाहेबांचे नाव विमानतळाला मिळत नाही, तो पर्यंत हा लढा कायम असेल.
>
> **: आमदार प्रशांत ठाकूर**

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील साहेबांचे नाव देण्यासाठीचा लढा उभा करताना रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर अशा विविध जिल्ह्यांतील भूमिपुत्र या ऐतिहासिक आंदोलनात सहभागी झाले. या सर्व भूमिपुत्रांचे जेथे राहतात तेथे वेगवेगळे संघर्ष आज उभे आहेत. त्यांच्या या संघर्षांमध्ये त्यांना सोबत करणे, त्यांच्या विषयांकडे शासनाचे लक्ष वेधून घेणे हीसुद्धा या लढयाची जबाबदारी आहे. आणि याच भावनेतून येत्या १३ जानेवारीला ही भूमिपुत्र परिषद होत आहे. या माध्यमातून आपल्या सर्व विषयांची उजळणी होणार आहे. हे सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकारला अल्टिमेटम देण्यात येणार आहे. त्यानंतरच्या पुढील टप्प्याची माहिती देताना सांगण्यात आले कि, राज्य सरकार भूमिपुत्रांच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करत आहे. सिडकोचा ठराव रद्द करून नव्याने लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा ठराव करून राज्य सरकारला द्यावा आणि तो प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारला द्यावा, हि आग्रही मागणी सातत्याने भूमिपुत्रांकडून होत असतानाही त्याला वाटाणाच्या अक्षता लावण्याचे काम सिडको आणि ठाकरे सरकार करीत आहे. त्यामुळे २४ जानेवारीला विमानतळाचे सुरु असलेले सर्व काम बंद पाडण्यात येणार आहे, असा एल्गारही यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समितीच्यावतीने जाहीर केला.

> भूमिपुत्रांच्या जिव्हाळ्याचा हा प्रश्न आहे. हि नुसती लढाई नाही तर हक्क आहे. भूमिपुत्रांच्या परिषदेत स्थनिक, प्रकल्पग्रस्तांच्या हिताचे ठराव मांडले जाणार आहे. परवानगी आणि कोरोनाचे नियम पाळून हि परिषद होणार आहे.
>
> **- माजी खासदार संजीव नाईक**

## संक्षिप्त...

### उत्तर प्रदेशसह पाच राज्यांच्या निवडणुका जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय निवडणूक आयुक्त सुशील चंद्रा यांनी आज उत्तर प्रदेश, पंजाब, गोवा, उत्तराखंड आणि मणिपूर या पाच राज्यांच्या निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम जाहीर केला. 'कोविड संकट असलं तरी निवडणूक प्रक्रिया पार पाडणं हे आमचं कर्तव्य आहे', असे नमूद करत चंद्रा यांनी निवडणुकांची घोषणा केली. त्यानुसार १० फेब्रुवारी ते ७ मार्च या दरम्यान सात टप्प्यांत मतदान होणार असून १० मार्च रोजी सर्व पाचही राज्यांत मतमोजणी पार पडणार आहे.

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूक सात टप्प्यांत होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान १० फेब्रुवारीला, दुसऱ्या टप्प्यातील मतदान १४ फेब्रुवारी, तिसऱ्या टप्प्यातील मतदान २० फेब्रुवारी, चौथ्या टप्प्यातील मतदान २३ फेब्रुवारी, पाचव्या टप्प्यातील मतदान २७ फेब्रुवारी, सहाव्या टप्प्यातील मतदान ३ मार्च आणि सातव्या टप्प्यातील मतदान ७ मार्च रोजी होणार आहे. पंजाब, उत्तराखंड आणि गोवा येथील सर्व जागांसाठी १४ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे तर मणिपूरमध्ये २७ फेब्रुवारी आणि ३ मार्च असे दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. पाचही राज्यांमध्ये एकाच दिवशी १० मार्च रोजी मतमोजणी केली जाणार आहे. निवडणूक होत असलेल्या पाचही राज्यांत आजच तत्काळ प्रभावाने आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. कोविड स्थिती लक्षात घेत आयोगाने कठोर नियम लावले आहेत. त्यानुसार रोड शो, पदयात्रा, सायकल यात्रा यांना मनाई करण्यात आली आहे. त्याचवेळी १५ जानेवारीपर्यंत जाहीर सभांवरही निर्बंध आणले गेले आहेत. घरोघरी जाऊन प्रचार करण्यास परवानगी असेल मात्र केवळ पाचच जण प्रचार करू शकतील, असे निवडणूक आयुक्तांनी नमूद केले.

## खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्र विकास आराखडा

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

महाराष्ट्र शासनाने खोपटा नव नगर अधिसूचित ३२ गावांचा समावेश असलेल्या क्षेत्रासाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार, सिडकोने सर्वसमावेशक व उत्तम दर्जाच्या सोयी व सुविधांनी परिपुर्ण विकास करण्यासाठी खोपटा नव नगर क्षेत्राचा विकास आराखडा तयार करण्याच्या इराद्याची सूचना प्रसिध्द् करण्यात आलेली आहे.

खोपटा नवनगर अधिसुचित क्षेत्राच्या विकासाचे उद्दिष्ट पायाभूत आणि सामाजिक सुविधा प्रदान करणे व विकासाच्या विविध क्षेत्रात संधी निर्माण करणे आहे. एकात्मिक प्रोत्साहनार्थ विकास नियंत्रण नियमावली (UDCPR) नुसार खोपटा क्षेत्रातील ६ गावांचा मंजूर विकास आराखडा तसेच उर्वरित २६ गावांचा विकास आराखडा परस्पर सुसंगत असावा, यासाठी २६ गावांचा विकास आराखडा तयार करत असतांना ६ गावांच्या मंजूर असलेल्या विकास आराखड्याची फेरतपासणी करुन त्यात बदल करण्याची आवश्यकता आहे.

नवी मुंबई व नैना क्षेत्राच्या मधोमध वसणा–या खोपटा अधिसुचित क्षेत्राचा नव्याने तयार झाल्यानंतर तेथे उत्तम विकास होईल व परिसर सर्वसमावेशक व उत्तम दर्जाच्या सोयी सुविधांनी परिपूर्णरित्या विकसित झाल्यावर सुनियोजित शहर म्हणून नावारुपास येईल. त्याचप्रमाणे यामुळे विविध क्षेत्रात विकासाच्या सुवर्णसंधी उपलब्ध होतील. खोपटा नव शहर अधिसूचित क्षेत्र व नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसुचित क्षेत्र (नैना) या दोन वेगळ्या प्रकल्पाकरिता शासनाने सिडकोस विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे.

खोपटा अधिसूचित क्षेत्राचा विकास आराखड्याचे नियोजन करण्याकरिता सर्व ग्रामपंचायतींना त्यांच्या गावांची आवश्यक अद्यावत माहिती पुरविण्याची विनंती करण्यात आलेली आहे, जेणेकरुन विकास आराखड्याचे नियोजन त्या अनुषंगाने तयार करता येईल. शहराचा

.../२

## राज्यात दिवसा जमावबंदी, रात्री संचारबंदी


### नियम धुडकावणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**



वाढत्या करोना रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात कठोर निर्बंध लागू केल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जनतेला एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. करोनाचे दूत होऊन इतरांचे आरोग्य धोक्यात आणू नका. आपल्याला कोणाचीही रोजीरोटी बंद करायची नाही. पण आरोग्याचे नियम पाळण्यात हलगर्जी करु नका. तुम्ही स्वत:चं आरोग्य चांगलं ठेवाल पण इतरांचे आरोग्य धोक्यात येईल, असे वर्तन होऊ नये. त्यामुळे नियम धुडकावणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, असे आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत.

करोनाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी रात्री राज्य सरकारकडून नवे निर्बंध जाहीर करण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्रात अखेर रात्रीची संचारबंदी लागू करण्यात आली आहे. रात्री ११ ते पहाटे पाच वाजेपर्यंत नागरिकांना घराबाहेर पडण्याची



परवानगी नसेल. तसेच दिवसभर जमावबंदीही लागू असेल. त्यामुळे पाचपेक्षा अधिक लोकांना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमता येणार नाही. तर जिम, स्पा आणि स्विमींग पूलही पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. तर खासगी कार्यालये, हॉटेल्स, नाट्यगृह, थिएटर्स आणि सलून्स ५० टक्के क्षमतेने चालवता येणार आहेत. तर मॉल्स सकाळी १० ते रात्री ८ या वेळेतच सुरु

.../२

## पाली अंबा नदी प्रदूषण व घाणीच्या विळख्यात

### नागरिक व प्राण्यांचे आरोग्य धोक्यात

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्याची जीवनवाहिनी असलेल्या अंबा नदीला प्रदूषण आणि घाणीने वेढले आहे. नदीच्या पाण्यावर तवंग व शेवाळ आले आहे. सांडपाणी, प्रदूषित पाणी, घाण व कचरा, वाळू उपसा यामुळे नदीचे नागरिक व प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्याबरोबर नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. आंबा नदीच्या पाण्याने पाली गावाची तहान भागते,



पाली शहराला येथील अंबा नदीतून पाणी पुरवठा होतो. तसेच सुधागड तालुक्यातील अंबा नदी शेजारील गावांतील लोक व प्राणी देखील याच पाण्याचा पिण्यासाठी व वापरासाठी वापर करतात. पावसाळ्यानंतर अनेक ठिकाणी बंधारे कार्यान्वीत करुन अंबा नदिचे पाणी अडविले जाते. त्यामुळे या साठलेल्या पाण्यात सध्या मोठ्या प्रमाणात हिरवळ तयार झाली आहे. तसेच नदितून वाहून आलेले प्रदुषित व सांडपाणी पुढे वाहून न जाता येथेच साठून राहते. रासायनिक कपंनीमधुन टाकऊ रसायन हे थेट आंबा नदीत सोडले जाते. तसेच रसायन व सांडपाण्याबरोबरच कचरा आणि घाण देखिल साठते. नदिवर महिला कपडे व भांडी धुतात. तसेच नदित टाकलेले निर्माल्य कुजल्याने देखिल पाणी खराब होते. किनाऱ्यावर टाकलेली घाण व कचरा पाण्यात जातो. परिणामी ते अधिक दुषित झाले आहे. पाण्याला उग्र स्वरुपाची दुर्गंध येते, चवही खराब लागते. पाणी प्रदुषित

.../२

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार ; आरोपीस अटक

**दै.रायगड नगरी । तळा**

कितीही जनजागृती केली तरी महिला अत्याचार काही थांबण्याचं नाव घेत नाहीयेत. रोज म्हटलं तरी महिला आणि लहान मुलींवर अत्याचार झाल्याच्या घटना समोर येतात. असाच एक भयंकर प्रकार तळा तालुक्यात समोर आला आहे.

तळा शहरात १५ वर्ष ९ महिने अल्पवयीन मुलीशी जवळीक साधून तळगड किल्ला वर फिरायला जावू अशा बहाण्याने फिर्यादीची मावस बहीणला सोबत घेऊन गेले असता आरोपी अबुजर इलियाज वलिले वय २१ या युवकाने तळगड शेजारील पडक्या घराचा आधार घेऊन तिला ओढत ओढत नेऊन तिच्या मनाविरुद्ध जबरदस्ती करून संभोग केला.

सदर घटना ७ जानेवारी २२ रोजी सायं ६ वा.दरम्यान घडली फिर्यादी ने केलेल्या तक्रारी नंतर आरोपी याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून तळा पोलीस ठाणे कॉ. गु. र. न १/२०२२ हा भा. द. वि.स कलम ३७६(१), २(ख), बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८ प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे.

सदर पुढील तपास पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांचे मार्गदर्शना खाली सहा.पो.निरीक्षक. शिवराज खराडे करीत आहेत.

# एसटी वाचवा; एसटी चालवा

कल्पकतेचा अभाव, आळशी नोकरशाही, भांडकुदळ कामगार संघटना, भ्रष्टाचाराचे खग्रास ग्रहण आणि सामान्य जनतेबद्दल सर्व राज्यकर्त्यांची अक्षम्य बेपर्वाई या साऱ्यांचे जालीम मिश्रण म्हणजे महाराष्ट्रातील राज्य परिवहन मंडळाची आजची अवस्था आहे. एकीकडे संप अजून चालू, दुसरीकडे निराश मनाने कामावर परणारे कर्मचारी, तिसरीकडे या संपातून आपला हिशेब पाहणारे काही बांडगुळी नेते, चौथीकडे निलंबन व बडतर्फीची तलवार आणि या सर्वांकडे निमूटपणे पाहात हाल सोसणारे अगणित प्रवासी हेच चित्र आजही आहे. महाराष्ट्राच्या परिवहन मंत्र्यांनी आणि एका संघटनेच्या नेत्यांनी संप मागे घेतल्याची जाहीर घोषणा करूनही कितीतरी दिवस झाले. आजही राज्यात शंभर टक्के एसटी सेवा सुरू नाही. मुंबईच्या आझाद मैदानात उपोषण व सत्याग्रहाला बसलेल्या कामगारांना पाठिंबा देण्यासाठी कावळ्याच्या छत्रीप्रमाणे अचानक उगवलेले राजकीय नेते आता कुठे गायब झाले? त्यांच्या पक्षांना आणि नेत्यांना कामगारांचे दुखणे संपवायचे आहे की त्यांच्या अर्धमेल्या जिवावर राजकीय मजा मारायची आहे? 'कोणत्याही स्थितीत एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलिनीकरण करता येणार नाही,' असे ठाम विधान अर्थखाते सांभाळणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. राज्य सरकारची ही भूमिका आर्थिक परिप्रेक्ष्यातून समजावून घेता येते. पण मग सगळ्यांनी मिळून राज्यातली एसटी मोडून खायची आहे का? राज्यातल्या सर्व पक्षांच्या नेत्यांकडे सहकारी संस्था, बँका आणि कारखाने मोडून खाण्याचा तसेच अनेक उद्योग अवसायानात काढून मग त्यांच्यावर खासगी सोनेरी कौले चढविण्याचा दांडगा अनुभव आहे. एसटीचे तसे करायचे सगळ्यांनी मिळून ठरविले आहे का? महाराष्ट्राचे एसटी महामंडळ हे एकेकाळी देशात आदर्श व अव्वल होते. राज्यातल्या अगदी ग्रुप ग्रामपंचायतीमधल्या छोट्या गावीही एसटी पोहोचली होती. आजही आहे. रोज प्रवास करणारे लाखो विद्यार्थी, कष्टकरी, शेतमजूर, व्यावसायिक, नोकरदार यांना एसटीचा आधार होता. हजारो विद्यार्थ्यांचे जेवणाचे डबे मोफत आणणारी एसटी ही 'अन्नदात्री' होती. 'आम्ही सातही भावंडं शहरात शिकलो; कारण आमची आई सगळ्यांना रोज एसटीने जेवणाचे डबे पाठवायाची,' अशी आठवण या महाविकास आघाडीचे कर्तेधर्ते, ज्येष्ठ नेते शरद पवार अनेकदा सांगतात. हाच अनुभव अनेकांनी घेतला असेल. पण ही सेवेची गरज आज जशी संपलेली नाही; तशी या एसटीबद्दलची समाजाची आपुलकीही संपलेली नाही. असे असताना वाटाघाटींसाठी केवळ परिवहन मंत्र्यांना खेटे घालायला लावण्याऐवजी महाविकास आघाडीचे सगळे ज्येष्ठ नेते या प्रश्नात मनापासून लक्ष का घालत नाहीत? त्यांनी ते घातले असते तर संप इतका चिघळला नसता. जवळपास एक लाख कर्मचारी असणारी आणि लक्षावधी नागरिकांना अहोरात्र सेवा देणारी एक सेवासंस्था आपण अशाने मारून टाकत आहोत, याची जाणीव राज्यकर्त्यांना नाही आणि कामगारांना उचकावून राजकीय पोळी भाजणाऱ्या कामगार नेते व राजकीय नेत्यांनाही नाही. एसटीकडे काय नाही? हजारो गाड्यांचा ताफा आहे. राज्यभर मोक्याच्या ठिकाणी स्थानके व डेपो आहेत. त्यांची बाजारभावाने किंमत कित्येक लाख कोटी रुपये होईल. उत्तम यंत्रशाळा आहेत. स्वत:ची इंधन साठवण्याची प्रचंड यंत्रणा आहे. उत्तम चालक, कर्मचारी आहेत. खासगी वाहनांच्या तुलनेत एसटीची सेवा स्वस्त व नियमित असल्याने आजही खेडोपाडी व शहरात एसटीवर अवलंबून असणारे लक्षावधी नागरिक, विद्यार्थी, रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आहेत. इतकी सारी अनुकूलता असताना एसटीनेच आम्ही जास्तीत जास्त नफा मिळवून त्यातला लाभांश कर्मचाऱ्यांना देऊ, अशी जिद्द बाळगायला हवी. मात्र, एसटीचे कंबरडे मोडून खासगी गाड्या पळवणारे छपरी पुढारी गावगन्ना कमी नाहीत. एसटीच्या या मारेकऱ्यांची साखळी मोडून काढण्याची सरकारमध्ये हिंमत नाही. या संपामुळे जर एसटीची सेवा कायमची खिळखिळी झाली आणि आजच वाढलेला खासगी वाहतुकीचा टक्का आणखी वाढला; तर संप संपल्यावरही एसटी मृत्युपंथाला लागेल. कदाचित, सर्वांना मिळून तेच करून दाखवायचे असावे. जगातली कोणतीही सार्वजनिक वाहतूक सेवा बेसुमार नफा कमावू शकत नाही. किंबहुना, ती तोट्यात पण प्रामाणिक सेवावृत्तीने चालवावी लागते. एकीकडे, लाखो कोटींचे मेट्रोमार्ग व सुसाट महामार्ग बांधायचे आणि दुसरीकडे, महाराष्ट्राला अनेक दशके अविरत सेवा देणारी एसटी मात्र मारून टाकायची, याला शहाणपण व लोकहित म्हणत नाहीत. एसटीच्या सर्व संपकरी कर्मचाऱ्यांनी आता आधी कामावर रुजू व्हावे आणि राज्य सरकारनेही निलंबन, बडतर्फीची कारवाई थांबवावी, मागे घ्यावी. ही कामगार आणि राज्य सरकार अशी लढाई दिसत असली तरी तिला काही कोटी प्रवाशांचा तिसरा पण अदृश्य कोन आहे. ही दुखणे जितके चिघळेल तितके या प्रवाशांचे कायमचे नुकसान होणार आहे. त्यांचीही चिंता कुणीतरी करा!

# माथेरानमध्ये कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश



**दै.रायगड नगरी । माथेरान**

नुकताच दि.८ जानेवारी रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने आधार कार्ड बायोमेट्रिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळेस कॉंग्रेस पक्षाच्या कॉंग्रेस महिला अध्यक्षा मंदिरा दळवी, विकास दळवी, प्रदीप रांजणे, प्रकाश रांजणे या दोघा भावांनी सुध्दा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा झेंडा खांद्यावर घेतला आहे.

हॉटेल स्प्रिंग वुड मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराच्या कार्यक्रमात कर्जत तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष भगवान चंचे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये,माथेरान राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष राजेश दळवी आणि रायगड जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस सरचिटणीस अजय सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रवेश करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस युवा अध्यक्ष सागर जोशी, किरण पेमारे, मंगेश सकपाळ, महिला आघाडी अध्यक्षा स्वाती सुनील कुमार, स्नेहा चव्हाण, मा. नगरसेविका वर्षा रॉड्रीक्झ,अश्वपाल संघटनेच्या अध्यक्षा आशाताई कदम आदी उपस्थित होते.

माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत त्याप्रमाणे विविध पक्षातील कार्यकर्ते हे आपल्या स्वतः च्या सोयीनुसार आणि अर्थातच स्वतःच्या पक्षात दुखावलेले असल्याने कुणी उमेदवारी मिळविण्यासाठी तर कुणी आर्थिक लाभासाठी सुध्दा काहीजण स्वतःच्या इच्छेनुसार अन्य पक्षात प्रवेश करताना मागील एक वर्षापासून इथे प्रत्येक पक्षात प्रवेश करण्याची जणू काही मालिकाच सुरू झाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळेच आता येणाऱ्या निवडणूक काळापूर्वी आणखीन काय काय नवीन बदल आणि घडामोडी या अल्प मतदार संख्या असणाऱ्या अगदीच छोट्याशा गावात समस्त नागरिकांना पहावयास मिळणार आ-हेत याकडे सर्वच नवोदित मतदारांचे सुध्दा लक्ष वेधले गेले आहे.

# हरवलेल्या पांडुरंग भगत यांच्या शोधात रबाळे पोलिस

**दै.रायगड नगरी । उरण**

पांडुरंग चांगा भगत वय वर्षे ६८ हे उरण तालुक्यातील चिरनेर गावातील मुळ रहिवासी असून नवीमुंबई येथील घणसोली या ठिकाणावरून रविवार दि. २ जानेवारी २०२२ रोजी सकाळी हरवले आहेत.

यासंदर्भात नवीमुंबई येथील रबाले पोलिस ठाण्यात पांडुरंग भगत हे हरवले असल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. चंद्रा पांडुरंग भगत (५४) यांनी नवीमुंबई येथील रबाले पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करताना माहिती दिली की,मी व माझे पती पांडुरंग चांगा भगत मुळ रहिवासी चिरनेर,ता.उरण, आम्ही दोघे पती, पत्नी आमच्या घणसोली येथील नातेवाईक मित्रमंडळींच्या घरी श्री सत्यनारायणाच्या पूजे निमित्ताने शुक्रवार दि ३१ डिसेंबर २०२१ रोजी गेलो. तसेच तेथेच वास्तव्यास होतो.परंतु रविवार दि २ जानेवारी २०२२ माझे पती पांडुरंग भगत हे सकाळी ७ च्या सुमारास उठून ठाणे शहरातून नातेवाईक मित्रमंडळी करुन येतो असे सांगून गेले.ते परतलेच नाहीत. परंतु पांडुरंग भगत हे गेले ते आजतागायत परत आले नाहीत.त्यानंतर त्यांचा शोध नातेवाईक मित्रमंडळी कडे घेतला,तरी ते सापडले नाहीत.तरी पांडुरंग चांगा भगत वय वर्षे ५४ रंग सावळा,उंची ५ फुट २ इंच, सडपातळ बांधा, अंगावर सफेद रंगाचा शर्ट,खाकी रंगाची पॅन्ट,केस काळे,थोडे विसर भोळे तरी या वर्णाची व्यक्ती कोणास आढळून आल्यास संबंधित पोलिस ठाण्याकडे माहिती द्यावी.

# अंशतः अनुदानित शिक्षकांना सेवा संरक्षण देणार : आ.बाळाराम पाटील



**दै.रायगड नगरी । तळा**

कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील यांनी अंशतः अनुदानित शिक्षकांना सेवा संरक्षण देणार असल्याचा विश्वास दिला आहे. महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेच्या वतीने कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील यांचा तळा तालुका शिक्षक संवाद दौरा बोरघर हायस्कूल येथे दिनांक ७ जानेवारी, २०२२ रोजी आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते.

जुनी पेन्शन योजना सर्वांना लागू करणे, अंशतः अनुदानित शिक्षकांना सेवा संरक्षण मिळवून देणे, घोषित व अघोषित शाळेंचे प्रश्न मार्गी लावणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवणे, पात्र, अपात्र शाळेंचे प्रश्न, प्राथमिक शाळा बंद न पडू देणे, ४० टक्के टप्प्यातील शाळेचे मागील वेतन अदा करणे, अंशतः अनुदानित शिक्षकांचे समायोजन करणे आदी प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आमदार बाळ-ाराम पाटील यांनी सांगितले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिपक रसाळ, शेतकरी कामगार पक्षाचे तळा तालुका सरचिटणीस धनराज गायकवाड, निवृत्त प्राचार्य आर के म्हात्रे, निवृत्त मुख्याध्यापक बी पी म्हात्रे,पुरोगामी शिक्षक संघटनेचे युवाध्यक्ष देवा पाटील, श्री बबन म्हात्रे, श्री रा गो पाटील, बोरघर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका चव्हाण मॅडम, पत्रकार कृष्णा भोसले, तळा तालुक्यातील मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. विशेष भेट म्हणून तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो.म. वेदक विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेजला भेट देऊन विविध समस्या जाणून घेतल्या.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, सचिव मंगेशशेठ देशमुख यांनी कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी मुख्याध्यापक श्री धुमाळ सर, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# ...तर पर्यटन व्यावसायिकांना आत्महत्या कराव्या लागतील ; विकेंड लॉकडाऊनच्या शंकेने पर्यटन व्यावसायिक अस्वस्थ

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य सरकार लवकरच विकेंड लॉकडाऊन जाहीर करणार आहे. या विकेंड लॉकडाऊनचा सर्वात जास्त फटका पर्यटन व्यावसायिकांना बसणार आहे. यापूर्वीच्या दोन लॉकडाऊनमध्ये पर्यटन व्यावसायिकांना कोणत्याही सवलती मिळाल्या नसल्यामुळे ते आधीच कर्जबाजारी झाले आहेत, त्यात विकेंड लाकडाऊन झाल्यास आमच्यापुढे आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही, असा सूर पर्यटन व्यावसायिकांमधून उमटत आहे.

अलिबाग तालुक्यात मांडवा ते रेवदंड्यापर्यंत कॉटेज, रिसॉर्ट, हॉलिडे होमच्या माध्यमातून पर्यटन व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. या व्यवसायामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीही होते. परंतु गेली दोन वर्षे कोरोनामुळे पर्यटन व्यवसायाला उतरती कळा लागली आहे. आता राज्य सरकार विकेंड लॉकडाऊन लावणार असल्यामुळे पर्यटन व्यावसायिक हवालदिल झाले आहेत.

पर्यटन व्यवसाय हा प्रामुख्याने शनिवार-रविवार असे दोन दिवस चालतो, तोच विकेंड लॉकडाऊनच्या नावावर बंद ठेवला तर आम्ही आणि आमच्या व्यवसायावर असलेल्यांनी जगावे कसे असा प्रश्न अलिबाग पर्यटन विकास संस्थेचे अध्यक्ष, सृष्टी फार्म, थळचे संचालक मनोज घरत यांनी केला आहे. तर कोरोना शनिवार-रविवारच येतो का? असा प्रश्न उपाध्यक्ष धोकवड्याच्या माय फार्मच्या संचालिका मानसी चेऊलकर यांनी सरकारला केला आहे. विकेंड लॉकडाऊनच्या नावावर पर्यटन व्यवसाय बंद केला जातोय, तसे नसेल तर दोन डोस घेतलेल्या पर्यटकांना शनिवार-रविवार पर्यटनाची परवानगी दिली जावी, अशी प्रतिक्रिया आवासच्या शिवांजली हॉलिडे होमचे अमिष शिरगावकर यांनी दिली. आम्हाला शुक्रवार, शनिवार, रविवार असे तीन दिवस ५० टक्के क्षमतेने पर्यटन व्यवसाय करण्याची परवानगी दिली जावी. उर्वरित ५ दिवस आम्हाला व्यवसाय बंद ठेवण्यास सांगितला तरी हरकत नाही, अशी प्रतिक्रिया आगरसुरेच्या यलो हाऊसचे संचालक सुबोध राऊत यांनी दिली. रिसॉर्ट, कॉटेज, हॉलिडे होममुळे कोरोना पसरला आहे असा कोणताही पुरावा सरकारकडे नसताना पर्यटन व्यवसायावर विकेंड लॉकडाऊन सरकार लादत असल्याचा आरोप आगरसुरे येथील ड्रीमलँड रिसॉर्टचे संचालक अँड. शेखर पांडव यांनी केला.

तसेच मोठ्या लोकांच्या बंगल्यामधून अनधिकृत चालणारा पर्यटन व्यवसाय कायम सुरू असतो त्याकडे जिल्हा प्रशासन लक्ष देत नाही, मात्र अधिकृतरित्या पर्यटन व्यवसाय करणाऱ्या आम्हा पर्यटन व्यावसायिकांवर बंधने लादली जातात. सरकारने विकेंड लॉकडाऊनच्या परिघातून पर्यटन व्यावसायिकांना काढले तरच पर्यटन क्षेत्र मजबूत होईल आणि पर्यटन क्षेत्रातून निर्माण होणारा रोजगार वाचेल असा सूर पर्यटन व्यावसायिकांतून उमटतो आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्र विकास आराखडा

विकास आराखडा तयार करतांना अस्तित्वातील असलेल्या गावांची वाढ लक्षात घेऊनच नियोजन करण्यात येईल.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या अधिनियमाप्रमाणे खोपटा अधिसुचित क्षेत्राचा विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावली निर्धारित कालावधीत तयार करून विविध टप्प्यावर जनतेकडून सुचना व हरकती मागविण्यात येतील व सदर सुचनांवर योग्य तो विचार करून शासनास मंजूरीकरिता सादर करण्यात येईल. विकास आराखडा मंजूर केल्यानंतरच पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीचे धोरण निश्चित केले जाईल.

## राज्यात दिवसा जमावबंदी, रात्री संचारबंदी

ठेवता येतील. तर मैदाने, उद्याने आणि पर्यटनस्थळेही पूर्णपणे बंद राहणार आहेत. मुंबईतील लोकल ट्रेनवर कोणतेही निर्बंध लादण्यात आलेले नाहीत.

पहाटे पाच ते रात्री ११ वाजेपर्यंत जमावबंदी, अत्यावश्यक कारणांशिवाय रात्री ११ ते पहाटे पाच वाजेपर्यंत संचारबंदी, सरकारी कार्यालयांमध्ये व्हिजिटर्सना परवानगीशिवाय प्रवेश नाही., लोकल ट्रेनवर कोणतेही निर्बंध नाहीत, सरकारी आणि खासगी कार्यालयांमध्ये ५० टक्के उपस्थिती बंधनकारक, करोना लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या कर्मचाऱ्यांनाच कार्यालयात उपस्थित राहण्याची परवानगी, विवाह सोहळ्याला फक्त ५० जणांना उपस्थित राहता येणार, अंत्यविधीला २० जणांना उपस्थित राहता येणार, राजकीय आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी ५० जणांच्या उपस्थितीची अट, शाळा आणि महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद राहतील., स्विमींग पूल्स, स्पा, जिम, वेलनेस सेंटर आणि ब्युटी सलून्स पूर्णपणे बंद राहणार, केशकर्तनालय (सलून्स) ५० टक्के क्षमतेने चालवता येणार. सलून्स सकाळी १० ते संध्याकाळी ७ या वेळेतच सुरु ठेवता येणार, नियोजित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांना निर्बंधांतून सूट. खेळाडुंना बायो बबलमध्ये राहावे लागणार. प्रेक्षकांना मैदानात उपस्थित राहता येणार नाही. दर तीन दिवसांनी खेळाडुंची करोना चाचणी करणे बंधनकारक असेल., अम्युझमेंट पार्क, किल्ले आणि स्थानिक पर्यटनस्थळे पूर्णपणे बंद राहतील., शॉपिंग मॉल्स आणि मार्केट कॉम्प्लेक्स ५० टक्के क्षमतेने सुरु ठेवता येणार. मॉलमध्ये करोना लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या लोकांनाच परवानगी, हॉटेल्स आणि रेस्टारंटस सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत ५० टक्के क्षमतेने चालवता येणार., महाराष्ट्रात प्रवेश करायचा असेल, तर कोविड प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस किंवा आरटी पीसीआ चाचणीचा निगेटीव्ह रिपोर्ट बंधनकारक, एमपीएससी, यूपीएससी परीक्षेसाठी किंवा स्पर्धा परीक्षांसाठी प्रवास करणाऱ्यांना हॉल तिकिटावर प्रवास करण्याची मुभा दिली जाईल, लसीचे दोन्ही डोस न झालेल्या व्यक्ती काम करताना आढळल्यास संबंधित हॉटेल, दुकान किंवा रेस्टॉरंटवर कारवाई होणार अशी नवी नियमावली आहे.

## पाली अंबा नदी प्रदूषण व घाणीच्या विळख्यात

झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

खालापूर तालुक्यातील चावणी आंबेनळी घाट व सुधागड तालुक्यातील मानखोरे या दोन ठिकाणांहून अंबा नदीचा उगम होतो आणि पुढे हे दोन्ही प्रवाह एकत्र येऊन मोठी नदी तयार होते. अनेक गावे समृद्ध करत ही नदी वडखळ जवळ धरमतरच्या खाडीला जाऊन मिळते. तब्बल ८० ते ९० किमीचा प्रवास करते. खालापूर, सुधागड, रोहा, अलिबाग आणि पेण अशा साधारण ४ तालुक्यातून अंबा नदी वाहते. यातील सर्वाधिक प्रवास सुधागड तालुक्यातून होतो. मात्र विविध कारणांनी अंबा नदीचेही अस्तित्व धोक्यात आले आहे.

अष्टविनायकापैकी एक तिर्थक्षेत्र असलेल्या पालीला कोणतीही प्रक्रिया न करता अंबा नदिचे पाली पुरविले जाते. मात्र पाली शुद्ध नळ पाणीपुरवठा योजना मागील १५ ते २० वर्षांपासून प्रलंबित आहे. शासनाने केलेल्या २००८ - ०९ च्या सर्व्हेनुसार पालीची लोकसंख्या व पालीत दररोज येणार्या भाविक व पर्यटकांच्या संख्येनुसार शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेचे नियोजन केले होते. एकूण ७ कोटी ७९ लाखाचा निधी व १० टक्के लोकवर्गणीद्वारा नळयोजना उभी राहणार होती. परंतू राजकीय श्रेयवादामध्ये हि योजना रखडली गेली. त्याबरोबर १० टक्के लोकवर्गणीचा प्रश्न देखिल होता. मात्र पालीला ''ब'' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळाला आहे. तसेच शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेसाठी ११ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजुर झाला आहे. आता ही रक्कम आणखी वाढली आहे. लोकवर्गणीची अट शिथील करण्यात आली आहे. पण अजुनही हि योजना कार्यान्वित होऊ शकलेली नाही. सर्वच राजकिय पक्ष व त्यांचे पुढारी या योजनेचे निवडणूकी पुरते भांडवल करतात. नगरपंचायत प्रस्थापित झाल्यावर तरी ही समस्या मार्गी लागेल अशी अपेक्षा पालीकर करत आहेत. असंख्य पाळीव व वन्यप्राणी यांचे जीवन अंबा नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे. दुषित पाण्यामुळे वन्य प्राण्यांना पाण्यासाठी इतर पाण्याच्या स्त्रोताचा शोधा घ्यावा लागतो. त्यांचेही हाल दुषित पाण्यामुळे होत आहेत.

# खांब-सुकेळी परिसरात अवकाळी पाऊस ; शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

बळीराजाच्या नशिबी सुगीचे दिवस नाहीच या ना त्या कारणाने बळीराजा कायम ग्रासला आहे. त्याच्यावर अनेक प्रकारचे संकट येत असतात जात असतात मात्र तो कधीच खचून जात नाही संपूर्ण जगाचा पोशिंदा समजला जातो सर्वांचीच भूक भागवण्याचे काम कवाड कष्ट करत तो भागवत असतो मागील दोन वर्षे त्याच्यावर अनेक संकट त्यातच गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरणानंतर शनिवार दि.८ जानेवारी रोजी खांब सुकेली परिसरात दुपारी १२ च्या सुमारास मोठया प्रमाणात अवकाळी पाऊस पडला. धुवांधार अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले.

सकाळी थंडी व नंतर पाऊस यामध्ये यामुळे लोकांच्या जीवनमानावर परिणाम होताना दिसत असून यामध्ये कोरोना ही लोकांची साथ सोडण्यास तयार नाही यातच भरीत भर म्हणून काल झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी-बागायतदारांच्या कडधान्य व भाजीपाला या पिकांना धोका निर्माण झाला असून यामुळे शेताकऱ्यांच्या चिंतेत प्रचंड वाढ झाली आहे. तसेच विटभट्टी व्यवसायिक यांची ही चिंता वाढली आहे.



# पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत कळंबुसरे प्राथमिक शाळेचे घवघवीत यश

**दै.रायगड नगरी । उरण**

सन २०२१ मध्ये संपन्न झालेल्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उरण तालुक्यातील कळंबुसरे शाळेने घवघवीत यश संपादन केले आहे.

कुमारी हर्षाली निलेश नाईक ही विद्यार्थीनी उरण तालुक्यात दुसरी आली असून रायगड जिल्हा गुणवत्ता यादीत २३ वी आली आहे. तर कुमारी जीया महेंद्र पाटील हिने शिष्यवृत्ती पटकावली आहे. या यशाने कळंबुसरे प्राथमिक शाळांची गुणवत्ता वाढली आहे.

पालकांनीही याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. दरम्यान या यशाबद्दल हर्षाली नाईक व जिया पाटील या विद्यार्थिनींचे शाळा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग, आणि शिक्षक वृंदाकडून अभिनंदन होत आहे. विविध स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.विश्वजीत जाधव हे श्री.मनोज भाईचंद ओसवाल, सौ.प्रियंका मनोज ओसवाल, श्री.मंगेश भाईचंद ओसवाल यांच्या मालकीची मौजे : मोग्रज, सर्व्हे क्र.१३, हिस्सा क्र.२/ब/१, क्षेत्रफळ १.५१.५० हे.आर.गुंठे, मौजे : मोग्रज, तालुका : कर्जत, जिल्हा : रायगड (सदरहू भूखंड) विकत घेणार आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमूद सदरहू भूखंडाबाबत मालक यांच्या मालकी हक्क, हितसंबंध व अधिकार याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसा हक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, भाडेपट्टा, लियन किंवा इतर बाबींद्वारे हरकत किंवा दावा असेल तर त्यांना विनंती करण्यात येते की, तशा प्रकारची हरकत किंवा दावा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्यावर १५ पंधरा दिवसांच्या आत लेखी सादर करावी व तसे न केल्यास सदरहू सदनिकेबाबत तशा प्रकारचा काही हक्क व अधिकार असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.

दि.०८/०१/२०२२

**सही/-**
**अॅड.मंगेश म. चव्हाण**
**ऑफिस क्र.सी-३१३, सी-विंग, पहिला मजला, वाशी प्लाझा, एच.डी.एफ.सी. बँक समोर, प्लॉट क्र.८० व ८१, सेक्टर-१७, वाशी नवी मुंबई ४००७०३**
**मो.नं.९८२०४२१३३९**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## प्रतिबंधीत पान मसाला व सुगंधीत तंबाखूचा साठा पनवेल तालुका पोलिसांनी केला हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मानवी आरोग्यास अपायकारक व शरिरास घातक असा प्रतिबंधीत पान मसाला व सुगंधीत तंबाखू विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या दोघा जणांनी जवळ बाळगला म्हणून पनवेल तालुका पोलिसांनी अजिवली गाव परिसरातून त्यांना ताब्यात घेतले असून यासाठी ते वापरत असलेले होंडा कंपनीची अ‍ॅक्टीव्हा ही मोटार सायकल सुद्धा ताब्यात घेतली आहे.

अशा प्रकारचा तंबाखू व पान मसाला जवळ बाळगत असल्याची माहिती वपोनि रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि धनश्री पवार व पो.शि.सतीश दराडे व पथकाने त्रिमुर्ती पेट्रोल पंपासमोर जुन्या मुंबई पुणे हायवे रोडवरील अजिवली गाव येथे छापा टाकून दिनेश राम जतन मोरया (२२) व राजेश फुलचंद चौरसिया (३७) या दोघांना मोटार सायकलीसह ताब्यात घेवून त्यांच्याकडून २५ हजार ९८७ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे व त्यांच्या विरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम १८८ , २७३, ३२८, ३४ सह अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ मधील कलम २६ (२) (आय), २६ (२) (आयव्ही), २७ (२) (ई), ५९ (२) अंतर्गत कारवाई केली आहे.

## कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्ष प्रवेश



**दै.रायगड नगरी । उरण**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र राज्याचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, प्रदेश महिला सरचिटणीस भावना घाणेकर यांच्या कार्य प्रणालीवर विश्वास ठेऊन पालकमंत्री आदितीताई तटकरे यांच्या उपस्थितीत उरण तालुक्यातील व परिसरातील पाणजे, डोंगरी फुंडे, जसखार, सोनारी, जासई, हनुमान कोळीवाडा, कुंडेगाव, बोकडवीरा, नविन शेवा, उरण, केगाव, नागाव, कोटनाका, मुळेखंड, करंजा, कळंबुसरे, धाकटी जुई, सारडे, वशेणी, पेण-रावे, मुरुड आदी गावातील २०० हुन अधिक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्ष प्रवेश केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, जिल्हा उपाध्यक्ष भार्गव पाटील, युवक जिल्हा उपाध्यक्ष समाधान म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस -पुखराज सुतार,जिल्हा सरचिटणीस दिपक माळी, उरण विधानसभा अध्यक्ष वैजनाथ ठाकूर, जिल्हा परिषद सदस्य कुंदा ठाकूर, तालुकाध्यक्ष मनोज भगत, युवक तालुकाध्यक्ष कैलास भोईर, शहराध्यक्ष गणेश नलावडे आदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# एसटी संपामुळे श्रीवर्धनमधील प्रवाशांचे प्रचंड हाल

## मुंबई जाण्यासाठी खाजगी वाहतुकदार घेतात अव्वाच्या सव्वा भाडे

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

एसटी कर्मचाऱ्यांनी दिवळीपासून संपाचे हत्यार उपसल्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. रायगड मधील जिल्ह्यातील बहुतांश स्थानकांमध्ये शुकशुकाट आहे. श्रीवर्धन आजारातून एसटी बसच्या ३-४ फेऱ्या पनवेल पर्यंत सुरू आहे मात्र लांब पल्ल्याच्या फेऱ्या पूर्ण बंद आहेत. खासगी प्रवासी वाहतूकदारांनी मात्र संपाचा फायदा उठवत अव्वाच्या सव्वा भाडे आकारत प्रवाशांची लूट सुरू केली आहे.



कोरोना रुग्णांची संख्या कमी झाल्यामुळे शाळा नोव्हेंबर पासून पूर्वत सुरू झाल्याने विद्यार्थीही उत्सुक होते. श्रीवर्धन तालुक्यातील पाचवीनंतरच्या जवळपास सर्वच शाळा सुरू झाल्याने शिक्षण व्यवस्था रुळावर येत असतानाच एसटीच्या संपाचे ग्रहण लागले आहे. दहावीपर्यंतच्या शिक्षणाची ग्रामीण भागात व्यवस्था आहे. पण बारावीनंतर उच्च शिक्षण, आयटीआय व इतर व्यावसायिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना म्हसळा तसेच श्रीवर्धन ला यावे लागते. ग्रामीण भागातून दररोज सकाळी विविध मार्गावरील बसमधून विद्यार्थी तालुक्यात येतात. मात्र या सर्वांचीच आता अडचण झाली आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी मागील दोन महिन्यापासून संप पुकारल्यामुळे बसने शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या तालुक्यातील शेकडोपासधारक विद्यार्थ्यांची दमछाक होत आहे. गावाकडून मुंबई तसेच मुंबईहून गावी जाण्यासाठी एसटी वाहतूक परवडण्यासारखी व सुरक्षित असते त्यामुळे आबालवृद्धांपासून सर्वचजण एसटी ला प्राधान्याने पसंती देतात मात्र सध्या विलनिकरणाच्या मुद्द्यावर एसटी कर्मचारी संपावर आहेत. त्याचा मोठा फटका हा एसटी महामंडळ व सामान्य प्रवाशांना बसत आहे.

श्रीवर्धन तसेच बोर्लीपंचतन मधून मुंबई तसेच नालासोपारा जाण्यासाठी ४०० ते ५०० रुपये भाडे खाजगी वाहतुकदार घेत आहेत. मात्र त्यांच्या वर कुणाचेही वचक नसल्याने प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे. शासनाने एसटी वाहतूक पूर्वत करण्यासाठी लवकरच तोडगा काढावा असे नागलोली ग्रुप ग्रामपंचायती चे उपसरपंच मिलन काते यांनी सांगितले.

# माथेरानमध्ये भाजप मार्फत आधार कार्ड शिबीरास उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने शासकीय शुल्क आकारून आधार कार्ड दुरुस्ती शिबिराचे दोन दिवसीय आयोजन करण्यात आले आहे त्यास नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला आहे.यावेळी भाजप अध्यक्ष प्रवीण सकपाळ, मा.नगरसेवक चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे, संदीप कदम ,राकेश चौधरी व लक्ष्मण शिंगाडे, नगरसेविका प्रियांका कदम, नगरसेविका रुपाली आखाडे, मा.अध्यक्ष विलास पाटील, अरविंद शेलार ,सुनील शिंदे, मनीषा पाटील मनोहर रांजणे, रजनी कदम, तुषार जांभळे, बाबू बर्गे, सुभाष भोसले, संजय भोसले, मा.नगरसेवक गजानन अबनावे, आंबो चौधरी, अमोल चौगुले, यांसह भाजपचे असंख्य कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. आज भारतीय जनता



पार्टीने आयोजित केलेल्या आधार कार्ड शिबिरास माथेरान शिवसेना शहर शाखा प्रमुख चंद्रकांत चौधरी, उपशहर प्रमुख प्रमोद नायक धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे, संयुक्त वन समिती अध्यक्ष योगेश जाधव, भास्कर शिंदे, अनिस शेख, यांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावली.

माथेरान मधील नागरिकांना विविध शासकीय अथवा निमशासकीय कामांसाठी अनेकदा कर्जत येथे जावे लागते ही बाब खूपच खर्चिक असून सर्वसामान्य लोकांना न परवडणारी आहे याकामी येथील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शासकीय शुल्क आकारून दोन दिवसीय आधार कार्ड दुरुस्ती शिबीर आयोजित केले त्यास नागरिकांनी चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला आहे. यापुढेही नागरिकांना आवश्यक असणाऱ्या महत्वपूर्ण शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे असे भाजपच्या पदाधिका-यांनी सांगितले.

# दै.रायगड नगरी प्रतिनिधी देवा पेरवी यांना उत्कृष्ठ पत्रकार पुरस्कार जाहीर

## खा.सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत नागोठणे येथे होणार पुरस्कार वितरण सोहळा

**दै.रायगड नगरी । पेण**

नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात येणारा रायगड जिल्ह्यातील उत्कृष्ठ पत्रकार पुरस्कार दै.रायगड नगरीचे पेण प्रतिनिधी देवा पेरवी यांना जाहीर करण्यात आला आहे. खासदार सुनिल तटकरे व दिग्गज मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार ९ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता नागोठणे येथे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे.



पत्रकार असोसिएशनतर्फे नागोठणे शहर व ग्रामीण विभागात गेली नऊ वर्षे सातत्याने समाजकार्य करण्यात येत आहे. त्याच बरोबर पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पत्रकारांना दरवर्षी पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. यंदाचा रायगड जिल्ह्यातील उत्कृष्ठ पत्रकार पुरस्कार पेण प्रेस क्लबचे अध्यक्ष, जन-तेचे विविध प्रश्न सोडविण्यात अग्रेसर असणारे पेणचे पत्रकार देवा पेरवी यांना तर कै. तात्यासाहेब टके जेष्ठ पत्रकार पुरस्कार मुंबई येथील रवींद्र महिमकर यांना आणि युवा पत्रकार पुरस्कार खेड-रत्नागिरी येथील चंद्रकांत बनकर यांना जाहीर करण्यात आले आहे. रविवार दि. ९ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ६.३० वाजता नागोठणे येथील श्री जोगेश्वरी मातेच्या प्रांगणात दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत सदर पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे.

यावेळी रायगडचे खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री अदिती तटकरे, आमदार महेंद्र दळवी, आमदार अनिकेत तटकरे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, किशोर जैन, आदी प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर कोरोना प्रतिबंधक सर्व नियम पाळून कार्यक्रम संपन्न होणार असल्याचे असोसिएशनचे संस्थापक श्यामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड.महेश पवार, उपाध्यक्ष धम्मशील सावंत यांनी बोल-ताना सांगितले आहे. पुरस्कार जाहीर झाल्याने राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व हितचिंतकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पाच वर्षात पनवेल तालुक्यात ५ हजार २४४ क्षयरोगाचे रुग्ण, १४४ जणांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्षयरोग हा विशिष्ट सूक्ष्मजंतूमुळे, म्हणजे जिवाणूंमुळे होण-ारा आजार आहे. क्षयरोग हा सामान्यपणे फुप्फुसाचा आजार असला तरी आतडी, त्वचा, रसग्रंथी, मेंदू, सांधे, हाडे, इत्यादी निरनिराळया अवयवांमध्ये तो होऊ शकतो. सर्व वयोगटांत हा आजार आढळतो. पण लहान मुलांमध्ये आणि मोठया माणसांत या रोगाचे वेगवेगळे रुप दिसते. निकृष्ट राहणीमान हे क्षयरोगाचे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. २०२१ मध्ये पनवेल तालुक्यात क्षयरोगाचे ९७९ रुग्ण सापडले असून चौदा जणांचा मृत्यू झाला आहे. २०१७ ते २०२१ या पाच वर्षात पनवेल तालुक्यात ५ हजार २४४ क्षयरोगाचे रुग्ण सापडले यात १४४ जणांचा मृत्यू झाला आहे.

टीबी शरीरात कुठेही उद्भवू शकतो. मानेतल्या वा काखेतल्या गाठींचा टीबी, मेंदूच्या आवरणाचा टीबी हाडाचा टीबी, पोटातल्या आतडय़ांचा टीबी अशा कोणत्याही अवयवांचा होऊ शकतो. संसर्ग झालेल्या व्यक्तीची रोग प्रतिकार शक्ती कमी झाल्यास अशा व्यक्तींना क्षयरोगाची लागण होते. एखाद्या व्यक्तीला सतत दोन आठवड्यापेक्षा जास्त काळ खोकला असणे, वजन कमी होणे, भूक मंदावणे, हलकासा परंतु संध्याकाळी वाढणारा ताप, छातीत दुखणे, रात्री घाम येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याने तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

क्षयरोग हवेवाटे, श्वासावाटे पसरतो. क्षयरोग हा सौम्य पण दीर्घ प्रकारचा दाह आहे. हा आजार महिनोनमहिने चालतो. यातही दोन मुख्य प्रकार आहेत.

एक म्हणजे लहान मुलांमध्ये होणारा क्षयरोग. दुसरा प्रौढ वयात येणारा क्षयरोग. क्षयरोगाचे निदान झाल्यास घाबरून जाऊ नये तर ताबडतोब योग्य ते उपचार सुरू करावेत. निदान झाल्यावर तो पूर्ण बरा होतो, हे लक्षात ठेवावे.

# आ.बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत पुरोगामी शिक्षक संघटनेची सभा संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे पुरोगामी शिक्षक संघटनेची सहविचार सभा ता.७ रोजी कोएसो मेंहेंदळे हायस्कूल येथे शिक्षक आ.बाळाराम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली.

यावेळी पनवेल क्रु.उ.बा.समिती माजी सभापती मोहन कडू, पुरोगामी संघटना जिल्हाध्यक्ष देवा पाटील, पनवेल अध्यक्ष म्हात्रे, पनवेल शि.वि.अधिकारी बबन म्हात्रे, रोहे ता.मुख्याध्यापक संघ अध्यक्ष रमेश मोसे, पी.डी.म्हात्रे, रा.घो. पाटील, सुरेश जंगम, दिपक जगताप, नितीन गोरिवले, सातारकर, मधुरा भिडे, रामचंद्र म्हात्रे, गणेश खरिवले, विठ्ठल मोरे आदी प्रमुख मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.




यावेळी उपस्थित शिक्षक वर्गाला मार्गदर्शन करताना आ.बाळाराम पाटील यांनी माझी बांधिलकी ही शिक्षक बंधू भगिनींशी असून ती कायमच राहणार असून शिक्षकांच्या सर्व समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी मी कायमच कटिबद्ध राहणार असल्याचे सांगतानाच जुनी पेन्शन योजना जोपर्यंत लागू होत नाही, तोपर्यंत स्वस्थ बसणार नसणार नसून पेन्शन बाबतचा आपला लढा हा चालूच राहिल असे सांगितले. तसेच ४० %अनुदानित शाळांचे प्रश्न,निसर्ग चक्रीवादळात नुकसान झालेल्या शाळांचा निधी, पगारांची समस्या,७ व्या आयोगाचा फरक आदी प्रश्नांबाबतही शिक्षकांच्या समस्यांचे निराकरण त्यांनी केले.या सभेमध्ये शिक्षकांच्या समस्या व प्रश्न योग्यरीत्या मार्गी लागाव्यात यासाठी रोहे तालुका पुरोगामी शिक्षक संघटनेची कार्यकारिणीही गठित करण्यात आली. या सभेचे सुत्रसंचलन नारायण पानसरे यांनी केले तर विनय मार्गे यांनी आभार व्यक्त करून सभेची यशस्वीरीत्या सांगता करण्यात आली.

# जासई हायस्कूल येथील मुख्याध्यापक कक्ष, अटल टिंकरिंग लॅब व पाणपोईचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । उरण**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा.पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई.या शैक्षणिक संकुलातील नूतनीकरण केलेल्या मुख्याध्यापक कक्ष, अटल टिंकरिंग लॅब व पाणपोई चे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे जेष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य,लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षिय मनोगतात त्यांनी शाळेच्या होत असलेल्या विकास व भरभराटी बद्दल समाधान व्यक्त करून कौतुक केले .तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री अरुण घाग व उपशिक्षक श्री म्हात्रे डी.बी.या पुरस्कार प्राप्त गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.



विद्यालयातील विविध स्पर्धा परीक्षेत चमकलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या हस्ते बक्षिसे देऊन त्यांना प्रोत्साहित केले.या जासई हायस्कूल च्या विकासात मा. श्री रामशेठ ठाकूर यांचा मोठा मोलाचा वाटा आहे,या पूर्वी विद्यालयाच्या अनेक अडी - अडचणी त्यांनी सोडविल्या आ-हेत. त्या प्रमाणे आता ही अडी - अडचणी समजून घेऊन विद्यालयाच्या प्रांगणातील जुनी मोडकळीस आलेल्या इमारतीचे नवीन बांधकाम करण्यासाठी भरीव मदतीचे आश्वासन अध्यक्ष रामशेठ ठाकूर यांनी दिले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आणि उद्योगपती मा.श्री जे.एम.म्हात्रे यांनी पाणपोईचे उद्घाटन करून आपल्या मनोगतातून शुभेच्छा दिल्या.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व कामगार नेते मा.श्री सुरेश पाटील यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा चढता आलेख आपल्या मनोगतातून व्यक्त करून शाळेच्या विकासा साठी मदत करण्याचे वचन दिल्या बद्दल मा.अध्यक्ष व प्रमुख पाहुण्या विषयी कृतज्ञता व्यत केली.तसेच या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर मा.श्री प्रमोद कोळी यांनी शाळेच्या कामाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. या समारंभासाठी रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी श्री ठाकूर आर. पी. सहाय्यक विभागीय अधिकारी श्री. फडतरे एस. एस.विद्यालयाचे चेअरमन श्री अरुण जगे,रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रविंद्र भोईर,जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत, अमृत ठाकूर,मधुकर पाटील,व्हॉईस चेअरमन श्री रामभाऊ घरत,स्थानिक सल्लागार समिती व शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य,शिक्षण प्रेमी ग्रामस्थ,मुख्यध्यापक अरुण घाग उपमुख्याध्यापक श्री.मोरे पी.पी. पर्यवेक्षक श्री साळुंखे आर. एस.सर्व सेवक वर्ग व विदयार्थी कोविड नियमांचे पालन करून उपस्थित होते .

# अखिल म्हसळा तालुका प्राथमिक शिक्षक संघ तालुका अध्यक्षपदी शुभदा दातार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ शाखा म्हसळा चे विद्यमान अध्यक्ष सुनिल पवार हे फेब्रुवारी अखेरीस सेवानिवृत्त होत असल्याने व व या कार्यकारिणीच्या कार्यकाल पूर्ण झाल्याने जिल्हा कार्यकारणी च्या सभेत झालेल्या ठरावानुसार दिनांक जानेवारी २०२२ रोजी शिक्षक संघ वर्धापन दिनाचे औचित्य साधून कन्याशाळा येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सुनिल पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेस निरीक्षक म्हणून जिल्हा संघाचे कार्याध्यक्ष- किशोर मोहिते, उपाध्यक्ष- गीतांजली भाटकर, हिशोब तपासणीस - कैलास कळस यांच्या उपस्थिती मध्ये नवीन कार्यकारिणी



जाहीर करण्यात आली. यामध्ये तालुका अध्यक्ष म्हणून सौ.शुभदा संतोष दातार, प्रकाश कृष्णा मांडवकर, रमेश गोविंद जाधव, संगीता आंबेडकर, सल्लागार दिनेश पाटील, असिफ मुकादम, महिला आघाडी प्रमुख सौ सुमित्रा विलास खेडेकर, उपाध्यक्ष विश्वास काणेकर, संगीता निरणे, शिवाजी चव्हाण, संघटक विजय घाटगे, समीर पाष्टे, मुनवारी कोंडविलकर, विजय निमजे, अब्बास शेख या सर्वांची सभाग्रहात एकमताने निवड करण्यात आली या सर्वांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देणेत आल्या.

आज पहिल्यांदाच अध्यक्ष पदासाठी महीला शिक्षकांची निवड केली याबद्दल महिला शिक्षक व सर्व उपस्थित शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले.यापूर्वी सौ. दातार यांनी जिल्हा संघाचे उपाध्यक्ष, तालुका संघाचे सल्लागार हे पद चांगले प्रकारे सांभाळले असल्याने त्यांचा संघटना वाढीसाठी नक्कीच फायदा होईल.

नूतन अध्यक्ष सौ. शुभदा दातार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संघटनेने माझ्यावर विश्वास ठेवून तालुका अध्यक्ष पदासाठी माझी निवड केली याबद्दल सर्वांना धन्यवाद दिले. मी तालुक्यातील सर्व शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी वरीष्ठ पातळीवर पाठपुरावा करून ते सोडवण्यासाठी तालुका कार्यकारिणी ला सोबत घेवून काम करेन अशी ग्वाही दिली आदि मान्यवरांनी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# संक्षिप्त...

## पेंढारमाळ येथे गावठी दारू हातभट्टीवर पोलीसांची कारवाई



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील घोटावडे ग्रामपंचायत हद्दीतील पेंढारमाळ ठाकुरवाडीच्या जंगल भागात ओहोळा जवळील गावठी दारू हातभट्टीवर गुरुवारी (ता.६) पाली पोलिसांनी कारवाई केली आहे. व तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पाली पोलिसांनी दिलेल्या सविस्तर माहितीनुसार कमा वाक, पांडू चौधरी व उमी घुटे हे येथे गावठी दारू हातभट्टी चालवून गावठी दारू विक्री करीत होते. येथे पोलीसांनी धाड टाकून गावठी दारू निर्मिती करण्यासाठी वापरलेले गूळ मिश्रित नवसागर व रसायन नष्ट करून मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक विश्वजीत काइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एन. डी. महाडिक करीत आहेत. या प्रकरणाची फिर्याद पोलीस शिपाई रामसेवक कांदे यांनी दिली.

# स्थानिक शेतकऱ्यांवरील अन्यायाच्या विरोधात शिवसेना खंबीर : शिरीष घरत

## अदानीच्या न्यू लॉन्च एकात्मिक गृह प्रकल्पाला स्थानिकांचा विरोध कायम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील भेरले येथे स्थानिक आदिवासी बांधवांवर अन्याय करणाऱ्या वाधवा कंपनीचे प्रकरण अजूनही नमते झाले नसले तरी केंद्र सरकारच्या आशिर्वादाने अदानी कंपनीने या परिसरातील शेतकऱ्यांची जवळपास १४० एकर जागा संपादित करून स्थानिक शेतकऱ्यांवर अन्याय सुरू केला. यामुळे येथील स्थानिक नागरिकांनी सातगाव शेतकरी सेनेची स्थापना केली. स्थानिकांना अदानीकडून होणाऱ्या अन्यायाविरोधात आता शेतकरी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून न्यायाची बाब समोर ठेवली. यावेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी आपण शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून राज्याचे नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे वचन दिले.

अदानी न्यू लॉन्च एकात्मिक गृह प्रकल्प हा १४० एकर जागेत उभा राहत आहे. यामध्ये अदानी समूहाकडून येथील गुरचरण जागा हडप केल्या जात असून स्थानिक शेतकऱ्यांच्या हाती धुपाटणे देण्याचा जाचक प्रकार घडत आहे. बाहेरील व्यक्तींना याठिकाणी कामे मिळत असून स्थानिकांना मात्र बघ्याची भूमिका घ्यावी



लागत आहे. येथील शेतकऱ्यांची धार्मिक स्थळे, हक्काची मैदाने अदानी समूहाकडून उध्वस्त होत आहेत. याबाबत स्थानिकांनी आवाज उठविण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांना शासकीय पातळीवरून नैराश्य हाती आले. अखेर येथील वांगणी तर्फे वाजे सातगाव स्थानिक शेतकरी सेनेचे सदस्य तथा ग्रा. पं.चे सदस्य अरुणशेठ जळे, ग्रा. पं.सदस्य चिंतामणी शेळके, सुषमा नितीन कडव, नितीन काना भोपी, स्थानिक शिवसैनिक अरुण पाटील, अनंता पाटील, रोशन कडव यांच्यासह वांगणी तर्फे वाजे सातगाव स्थानिक शेतकरी सेनेचे पदाधिकारी यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांचे कार्यालय गाठले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख हे आजारपणामुळे कार्यालयात नसल्याने या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. तसेच याठिकाणी शिवसेनेचे तालुका संघटक भरत पाटील, पनवेल तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल यांची भेट घेतली.

यावेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या आदेशान्वये या शेतकऱ्यांना शिवसेना मदत करण्यास खंबीर असल्याचे सांगण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला आम्ही शिवसेनेच्यावतीने न्याय मिळवून देण्यासाठी नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मदतीने अदानी समूहाला त्यांची जागा दाखवून स्थानिक शेतकऱ्यांना त्यांचे हक्क मिळवून देणार असल्याचे वचन यावेळी देण्यात आले. यावेळी शिवसेनेचे पनवेल तालुका संघटक भरत पाटील, पाली देवद विभाग प्रमुख विशाल भोईर, शाखाप्रमुख गुरुनाथ वाघमारे, पनवेल उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी आदींसह वांगणी तर्फे वाजे सातगाव स्थानिक शेतकरी सेनेचे पदाधिकारी तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

स्थानिक शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी शिवसेना नेहमीच एक पाऊल पुढे राहिली आहे. आजही बेरोजगार तरुणांसाठी आम्ही शिवसेनेच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करून दिली आहे, जेणे करून आमचा एकही माणूस उपाशी न राहता खंबीरपणे पुढे गेला पाहिजे. त्यापद्धतीने येथील शेतकऱ्यांवर जर अन्याय होत असेल तर शिवसेना पक्ष कदापी सहन करून घेणार नाही. आणि याठिकाणी स्थानिकांच्या हातचे रोजगार कोणी हिसकावून घेत असतील तर अशा वृत्तींना ठेचण्यासाठी आम्ही बाळासाहेबांचे शिवसैनिक दोन पावले पुढे असणार आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणार.

**- शिरीष घरत, जिल्हाप्रमुख, रायगड - शिवसेना**

## मुख्यमंत्र्यांना १० लाख पत्र पाठविण्यास उद्यापासून सुरुवात : विक्रांत पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्यार्थ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी करणारे विद्यापीठ कायदा सुधारणा विधेयक (काळे विधेयक) महविकास आघाडी सरकारने मुद्दाम घाई घाईने पारित करून घेतले.या माध्यमातून प्र.कुलपती हे नवीन पद तयार करून सन्मा कुलपतींचे अधिकार उच्च तंत्र शिक्षण मंत्री यांना दिले जाणार आहेत.विद्यापीठांना राजकारणाचा अड्डा बनविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. असा आरोप भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांनी केला आहे.

भविष्यात कुलगुरूंच्या नियुक्त्या ,विद्यार्थ्यांच्या पदव्या या सगळ्यातच आरोग्य सेवक भरती परीक्षा ,म्हाडा परीक्षा प्रमाणे करोडोंच्या भ्रष्टाचाराचे विषय करण्यासाठी यांना हे प्र.कुलपती पद पाहिजे का? हा प्रश्न विद्यार्थी विच–ारात आहेत. या काळया विधेयकाला विरोध करत विद्यार्थी बांधवांना सोबत घेऊन १० लाख पत्र भारतीय जनता युवा मोर्चा मुख्यमंत्र्यांना पाठविणार आहे. तसेच ज्यांचा या काळया कायद्याला विरोध आहे त्यांनी ७७४५०५०१११ या क्रमांकावर मिस् कॉल द्यावा असेही आवाहन करीत आहोत.

## माथेरानमध्ये लवकरच कोव्हॅक्सिनचे लसीकरण : प्रशासक सुरेखा भणगे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील नागरिकांच्या आग्रहास्तव येथील बैरामजी जिजीभाई रुग्णालयात फक्त कोविशिल्ड ही लस उपलब्ध असली, तरी आम्ही येथील विद्यार्थ्यांसाठी मा.जिल्हाधिकारी व मा.सी.एस. यांच्याकडे विनंती करून कोव्हॅक्सिनची सोय उपलब्ध करून घेतली आहे.



१५ ते १८ या वयोगटातील शाळेतील व शाळाबाह्य विद्यार्थी यांसाठी नगरपरिषद माथेरान मधील बैरामजी जिजीभाई रुग्णालयाच्या माध्यमातून आपण लवकरच कोव्हॅक्सिनच्या लसीकरणासाठी दोन्हीही शाळेत कॅम्प आयोजित करणार आहोत.

तरी सर्व पालकांना विनंती आहे की शाळेतील मुख्याध्यापीका, शिक्षक यांकडे आपल्या पाल्याची नोंदणी झाली की नाही याची खातरजमा करावी. त्याचबरोबर शाळाबाह्य विद्यार्थी जे हॉटेल, व इतर आस्थापना मध्ये असतील त्या सर्वांनी आपल्या, या वयोगटातील मुलांचे लसीकरण होईल, त्यासाठी नगरपरिषद मधील आरोग्य विभागाचे सदानंद इंगळे सर, डॉ उदय तांबे यांच्याशी संपर्क साधावा. जेणे करून पुढील ३/४ दिवसात या वयोगटातील सर्व मुलांना / विद्यार्थ्यांना यांचा लाभ घेता येईल. व आपल्या माथेरान शहरांभोंवती एक सुरक्षित कवच कुंडल आपल्याला निर्माण करता येईल.असे आवाहन माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी जनतेला केले आहे.



**दैनिक लोकमतचे पत्रकार मयुर तांबडे यांना निर्भीड युवा पुरस्कार मिळाल्याबद्दल क्रांतिकारी सेवा संघाचे अध्यक्ष नामदेव शेठ फडके, भगत वाडी येथील दत्ता शेठ भगत, बाळा शेठ फडके, वामन शेळके, राज पाटील, गजानन पाटील, नरेंद्र भोपी, डिके भोपी यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.**

## व्हिक्टोरीया क्रॉस मानचिन्हधारक यशवंतराव घाडगे उत्सवावर कोरोनाचे सावट



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

निसर्ग चक्रीवादळात क्षती पोहचलेला व्हिक्टोरीया क्रॉस मानचिन्हधारक (मरणोत्तर) शहिद वीर यशवंतराव घाडगे यांचा पुतळा, नव्याने बांधण्यात आलेल्या देखण्या स्मारकात पुनःस्थापित करण्यात आला आहे. संपूर्ण धातू मध्ये बनविलाला हा वजनी पुतळा एवढ्या मोठ्या वादळात कोसळलेल्या झाडामुळे खाली पडला होता. परंतु त्याचे फारसे नुकसान झाले नाही, मात्र स्मारकाचे बांधकाम ढासळले होते. माणगांवचे वैभव असलेले स्मारक पुन्हा नव्याने उभारण्यात आलेने जवळपास दिड वर्षाचे कालावधीनंतर माणगांव मधिल हे प्रेरणास्थळ विलक्षण सुंदर झाले आहे.

रायगडच्या तरुण तडफदार पालकमंत्री नाम. आदिती तटकरे यांच्या कारकिर्दीतील पहीला आमदार निधी सुमारे १५ लाख हा वीर यशवंतराव घाडगे यांच्या स्मारकासाठी दिला. गतवर्षी मंत्रीपदी विराजमान झाल्या नंतर याच उत्सवासाठी माणगांव येथे पहिल्यांदा आल्याची आठवण सांगताना, परिसरातील भावी पिढीकरीता प्रेरणादायी ठरेल असे भव्य–दिव्य स्मारक लवकरच उभारणार व त्या कामाचे भुमीपुजन यावर्षी वीरपत्नी लक्ष्मीबाई घाडगे यांच्या हस्ते होणार, असे विश्वासात्मक वक्तव्य नाम. कु.आदिती तटकरे यांनी आपल्या भाषणात त्यावेळी व्यक्त केले होते.

माणगांव प्रांताधिकारी प्रशाली जाधव दिघावकर यांनी विशेष लक्ष घालुन हे रेखीव देखणे स्मारक आज निर्माण झाले आहे. दरवर्षी ९ जानेवारीला या ठिकाणी मोठ्या उत्साहात शासकिय पध्दतीने मान्यवरांचे उपस्थितीत शहिद वीर घाडगे उत्सव साजरा केला जातो. यंदा पुन्हा एकदा कोरोनाचा वाढता धोका लक्षात घेता या उत्सवावर कोरोनाचे सावट आहे. तसेच वीरपत्नी लक्ष्मीबाई घाडगे यांचे प्रकृतीस्वास्थ्य ठीक नसल्याने त्याही उपस्थित राहणार नसल्याचे समजते. यामुळे नजिकच्या काळात एक शानदार सोहळ्याचे आयोजन करुन सुंदर स्मारकाचा जिर्णोध्दार करण्यात येईल. सध्या आचार–संहिता लागु असल्याने शासन नियमांचे पालन करुन केवळ वीर यशवंत घाडगे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन उत्सव अत्यंत साधेपणात साजरा केला जाणार आहे.

तसेच कोणत्याही प्रकारचे पथसंचलन वा कार्यक्रम होणार नाहीत. अशी माहिती माणगांवच्या तहसिलदार प्रियंका आयरे यांनी त्यांचेशी संपर्क केले असता आमचे जवळ दिली आहे. शहिद वीर यशवंतराव घाटगे व्हिक्टोरिया क्रॉस मानचिन्हधारक (मरणोत्तर ) यांचा जयंती समारंभ रविवार दि. ९ जानेवारी २०२२ रोजी जुने तहसिल कार्यालय माणगांव परिसर येथे सकाळी नऊ वाजता साजरा होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रांताधिकारी श्रीमती प्रशाली जाधव–दिघावकर या भुषविणार असुन सकाळी नऊ ते सव्वा नऊ उपविभागीय अधिकारी कार्यालय माणगांव येथे ध्वजारोहन तसेच वीरपत्नी श्रीमती लक्ष्मीबाई यशवंतराव घाडगे व मान्यवरांचे शुभहस्ते शहिद वीर यशवंतराव घाटगे ( व्हि. सी ) पुतळ्यास पुष्पहार अर्पण करणार, त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक, प्रमुख अतिथींचे स्वागत, अध्यक्षांचे मनोगत व आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. माणगांवचे गटविकास अधिकारी, पोलीस निरिक्षक, मुख्याधिकारी नगर पंचायत, तालुका कृषी अधिकारी, गट शिक्षण अधिकारी पं.स, उपअभियंता सा. बां. विभाग, उप अधिक्षक भुमी अभिलेख, परिक्षेत्र वन अधिकारी, उप अभियंता लघु पाटबंधारे यांचे कर्मचारी वृंदांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम साधेपणात होणार असल्याची रुपरेषा आखण्यात आली असुन तसे दि.६ जानेवारीचे पत्र तहसिलदार यांनी संबंधित शासकिय विभागांना दिले आहे.

## दिवेआगर विकासो निवडणुकीत तोडणकर पॅनलचा विजय

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – श्रीवर्धन तालुक्यातील दिवे–आगर येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची पंचवार्षिक निवडणूक रविवार दिनांक २ जानेवारी रोजी १२ जागांसाठी झालेल्या चुरशीच्या निवडणूकीत विजय तोडणकर प्रणित पॅनल चा दणदणीत विजय झाला आहे.

विजय तोडणकर दिवेआगर सहकार पॅनेलने श्री सुवर्ण गणेश पॅनेलचा ९ विरूद्ध २ ने धुव्वा उडवुन पराभव केला आहे. सोसायटीची मुदत २०१९ मध्ये संपली होती. त्यामुळे गेली २ वर्षे ही निवडणूक कोरोना मुळे पुढे ढकलली जात होती. मात्र, झालेल्या निवडणूकीत तोडणकर पॅनेल ने बाजी मारली आहे. विजय तोडणकर प्रणित दिवेआगर सहकार पॅनलचे सिया रुपेश मुद्राळे, नेहा नंदन पाटील, कौशल सदानंद वाणी, राजन किसन रिळकर, संदेश वसंत गुरव, शेखर बाळा कोसबे, सुजित भाऊ गुरव,



योगेश मदन पारकर, सौरभ सुरेश तोडणकर व गजानन् नारायण चोगले हे बिनविरोध निवडून आले तर श्री गणेश पॅनल चे वैभव पेनसे, किशोर पिळणकर हे निवडून आले.

गावपातळीवर शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणारी सर्वात मोठी संस्था म्हणजे विविध कार्यकारी सोसायटी. ग्रामीण भागामध्ये विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांमार्फत शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला जात असल्याने या सोसायट्या शेतकऱ्यांचा मुख्य आधार असतो. या सोसायट्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पीक कर्जही देण्यात येते. पीक कर्जाबरोबरच खते, बियाणे, शेतीची अवजारे यासाठीही सोसायट्या कर्जपुरवठा करतात.

## विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त क्रिकेटच्या सामन्याचे आयोजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भातान येथे श्री दत्त क्रिकेट संघाने दि.७ ते १० जानेवारी रोजी ग्रामीण नाईट क्रिकेट सामन्याचे आयोजन केले आहे. यानिमित्त विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी सामन्याला भेट देऊन सामन्याचे शुभारंभ केले.

यावेळी त्यांच्यासह सरपंच सुभाष भोईर, उपसरपंच केशव गायकर, मा.सरपंच नंदकुमार मुकादम, मा.सरपंच चंद्रकांत भोईर, ग्रा.सदस्य दीपक ठाकूर, ग्रा.सदस्य अनिल काठावले, ग्रा.सदस्य नरेश भोईर, ग्रा.सदस्य सुनील सते, अनंता मुकादम, सुरेश भोईर, कृष्णा गाताडे, नितीन भोईर, संतोष भोईर, बाळाराम भोईर, जनार्दन घरत, अमिटी विद्यापीठाचे शरंजित सर, के.के.सिंग तसेच खेळाडू व रसिक प्रेक्षक यावेळी उपस्थित होते.

## हुंडाई क्रेटा गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१० लाख रुपये किंमतीची हुंडाई क्रेटा गाडीची चोरी केल्याची घटना शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटी येथे घडली आहे.

सुर्यकांत कोळी हे आशादीप बिल्डींग प्लॉट नं.११९ येथे राहण्यास असून त्यांनी त्यांची १० लाख रुपये किंमतीची हुंडाई क्रेटा गाडी क्र.एमएच–४६–बीक्यू–३२०४ ही त्यांच्या राहत्या बिल्डींगसमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर गाडी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पो–लीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

दिनांक ७ जानेवारी २०२२ रोजी रा.जि.प शाळा काळाधोंडा– उरण येथे साजरा करण्यात आला.सदर कार्यक्रमात विविध व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये रा जि प शाळा चिरनेर ता. उरणचे प्रविण म्हात्रे (आदर्श शिक्षक पुरस्कार), संगिता गावंड(दैनिक रायगड नगरी विशेष पुरस्कार) व सुरेश पाटील (वक्तृत्व स्पर्धा–तृतीय क्रमांक) अशा तिघांचा सन्मान करण्यात आला.तसेच तालुक्यातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी ,त्यांचे शिक्षक व पालक यांचाही सत्कार करण्यात आला. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारे शिक्षक रत्नाकर पाटील यांचा सत्कार हा कार्यक्रमाचा मानबिंदू ठरला.सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगिता चंदणे (विस्तार अधिकारी शिक्षण) तसेच संघटनेचे माजी अध्यक्ष म. ता.ठाकूर, ब.ना. ठाकूर ,विदयमान अध्यक्ष अंकूश पाटील तसेच केंद्रप्रमुख के. पा.म्हात्रे , सर्व संघटनांचे अध्यक्ष उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात संजय केणी,रंजना केणी, उपेंद्र म्हात्रे व इतर संघटनेचे कार्यकर्ते यांनी मेहनत घेतली.